**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ४० वा दिनांक : २९/१०/२०२४ वार : मंगळवार


## भाजपची २५ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर



**मुंबई** : भाजपने सोमवारी विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या २५ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली. त्यात पक्षाने काँग्रेसचे बंडखोर नेते तथा विद्यमान आमदार जितेश अंतापूरकर यांना देगलूर राखीव विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. तर कारंजा येथून सई डहाके, सावनेर येथून आशिष देशमुख, मूर्तिजापूर येथून हरीश पिंपळे यांना मैदानात उतरवले आहे.

भाजपने नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी नांदेड दक्षिण ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर संतुक हंबर्डे यांना उमेदवारी दिली आहे. संतुक हंबर्डे हे काँग्रेसचे नांदेड दक्षिण मतदारसंघाचे बंधू आहेत. त्यामुळे याठिकाणी दोन्ही भाऊ एकमेकांविरोधात प्रचार करताना दिसतील. दुसरीकडे, काँग्रेसने या पोटनिवडणुकीसाठी दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांचे सुपुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेस खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे ही पोटनिवडणूक होत आहे.

महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा फड रंगणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. उद्या मंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे भाजपने आज आपल्या २५ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली.

भाजपने आपल्या नव्या यादीत देगलूर राखीव विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे बंडखोर नेते तथा विद्यमान आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांना उमेदवारी दिली आहे. तर लातूर शहर येथून डॉक्टर अर्चना शैलेश पाटील यांना मैदानात उतरवले आहे.

तिवसा मतदारसंघातून भाजपने राजेश वानखेडे, मोर्शी येथून उमेश यावलकर, आर्वी येथून सुमित वानखेडे, काटोल येथून चरणसिंग ठाकरू, नागपूर मध्य येथून प्रवीण दटके, नागपूर पश्चिम येथून सुधाकर कोहळे, नागपूर उत्तर येथून डॉक्टर मिलिंद माने, साकोली येथून अविनाश ब्राह्मणकर यांना उमेदवारी दिली आहे.

याशिवाय चंद्रपूर येथून किशोर जोरगेवार, आर्णी येथून राजू तोडसाम, उमरखेड येथून किशन वानखेडे, डहानू येथून विनोद मेढा, वसई येथून स्नेहा दुबे, बोरीवली येथून संजय उपाध्याय, वर्सोवा येथून भारती लव्हेकर, घाटकोपर पूर्व येथून पराग शाह, आष्टी येथून सुरेश धस, माळशिरस येतून राम सातपुते, कराड उत्तर येथून मनोज घोरपडे व पळूस कडेगाव विधानसभा मतदारसंघातून संग्राम देशमुख यांना उमेदवारी दिली आहे.

## समीर वानखेडे नोकरी वाचवण्यासाठी निवडणूक लढत आहे - नवाब मलिक

**मुंबई** : समीर वानखेडे धारावी मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. समीर वानखेडे निवडणूक लढत असल्यामुळे ते पुन्हा एकदा नवाब मलिकांच्या निशाण्यावर आले आहेत. समीर वानखेडे हे आपली नोकरी वाचवण्यासाठी निवडणूक लढत आहेत, असा दावा नवाब मलिक यांनी केला. सीबीआयने त्यांच्यावर गुन्हा दाखल केला असून त्यांची चौकशी सुरू आहे. उच्च न्यायालयाकडून तात्पुरते संरक्षण मिळाले आहे. मी त्यांचा उघड केलेला फर्जीवाडा सत्य ठरला असून आपल्याला संरक्षण मिळण्यासाठी ते राजकारणात आले आहेत, असेही नवाब मलिक म्हणाले.

समीर वानखेडे हे नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचे झोनल डायरेक्टर असताना शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान ड्रग्ज प्रकरणामुळे चर्चेत आले होते. या प्रकरणात वानखेडेंनी आर्यन खानला अटक केली होती. मात्र, हे संपूर्ण प्रकरण बोगस असल्याचा दावा नवाब मलिक यांनी केला होता.

नवाब मलिक म्हणाले की, मी समीर वानखेडे यांचा फर्जीवाडा उघड केला होता. तो सत्य ठरला आहे. सीबीआयने वानखेडेंवर गुन्हा दाखल केला असून त्यांना या प्रकरणात तात्पुरता जामीन मिळाला आहे. फर्जीवाडा करणाऱ्यांना लोकं मते देणार नाहीत. त्यांची नोकरी जाणारच आहे. त्यामुळे संरक्षण मिळण्यासाठी ते राजकारणात उतरले असून निवडणूक लढवत आहेत. जे पेरले तेच उगवणार आहे.

अणुशक्तीनगर मतदारसंघात शरद पवार गटाकडून अभिनेत्री स्वरा भास्कर हिचे पती फहाद अहमद यांना उमदेवारी दिली आहे. त्यांच्याविरोधात अजित पवार गटाकडून नवाब मलिक यांच्या कन्या सना मलिक या रिंगणात आहेत. फहाद अहमद यांना उमेदवारी दिल्याने शरद पवार गटात नाराजी सुरू आहे. यावर बोलताना नवाब मलिक म्हणाले की, अणुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघात शरद पवार गटातून कोण लढणार आणि कुणाला तिकीट दिले हा विषय माझा नाही. आम्ही केलेली कामे आणि लोकांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास या गोष्टी आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत, असेही मलिक म्हणाले.

दरम्यान, आपण निवडणूक लढवणार असल्याचे नवाब मलिक यांनी सांगितले. उद्या मानखुर्द शिवाजी नगर मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरणार असल्याचे ते म्हणाले. या मतदारसंघात माझा होणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मानखुर्द शिवाजी नगर मतदारसंघात लोकांना घाबरवणे, धमकावणे, पैसे उकळणे असे चित्रपटांमध्ये दाखवण्यात येणारे राजकारण या भागात घडत आहेत. अंमली पदार्थ हा या मतदारसंघातील मुख्य प्रश्न आहे. यावर नियंत्रण आणण्याची गरज असल्याचेही नवाब मलिक म्हणाले.

## एमआयएमचा गनिमी कावा उद्या समजेल - इम्तियाज जलील



**छत्रपती संभाजीनगर** : यंदाच्या विधानसभा निवडणुकीत एमआयएम गनिमी कावा करणार आहे. आमच्या पक्षाचा गनिमी कावा काय आहे ते उद्या समजेल, असे विधान एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केले आहे. त्यांच्या विधानानंतर राजकीय वर्तुळात सस्पेन्स वाढला आहे. त्यांचा गनिमी कावा काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विधानसभा निवडणुकीसोबतच नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक होणार आहे. इम्तियाज जलील नांदेड लोकसभा लढणार असल्याच चर्चा आहे. यावर बोलताना इम्तियाज जलील म्हणाले, मी नांदेड लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज घेतला असून तो भरून ठेवला आहे. उद्या दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहेत. आम्हाला गनिमी माहिती आहे. उद्या दुपारपर्यंत तुम्हाला गनिमी कावा कसा असतो हे समजेल. राजकारणात प्रत्येक गोष्ट उघड करायची नसते, असे जलील म्हणाले.

इम्तियाज जलील पुढे म्हणाले, भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गट आमचा प्रमुख विरोधक आहे. पण आमची महाविकास आघाडीशी मैत्री आहे, असे अजिबात नाही. यावेळी आम्ही कमी जागा लढवण्याचा निर्णय घेतला असून आतापर्यंत १० जागांवर उमेदवार निश्चित केले आहेत. ते एका वृत्तवाहिनीशी बोलत होते.

एमआयएम पक्षाने २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात आपले खाते उघडले होते. त्यावेळी इम्तियाज जलील हे औरंगाबाद शहरातून आमदार झाले होते. त्यानंतर २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीत त्यांचा विजय झाला होता. राज्यात एमआयएम पक्षाचा एक ठरलेला मतदार आहे. त्यामुळे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत एमआयएम पक्षाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यातच इम्तियाज जलील यांनी गनिमी कावा आणि सस्पेन्स बाबत विधान केल्याने, एमआयएम नेमका कोणता गनिमी कावा करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ ऑक्टोबर २०२४


## भाजप महाराष्ट्रात स्वबळावर जिंकू शकत नाही - देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** महाराष्ट्रात भारतीय जनता पक्ष स्वबळावर जिंकू शकत नाही. पण तो सर्वात मोठा पक्ष म्हणून निश्चितच पुढे येईल, असे महत्त्वापूर्ण विधान भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी हे विधान केल्यामुळे त्याची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

देवेंद्र फडणवीस एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, राज्यात भाजप स्वबळावर विधानसभा निवडणूक जिंकू शकत नाही. पण आमच्याकडे सर्वाधिक जागा व सर्वाधिक मतांची टक्केवारी आहे. वस्तुस्थिती व नेमकी परिस्थिती काय आहे? याविषयी आपण व्यावहारिक असले पाहिजे. त्यामुळे निवडणुकीनंतर भाजप राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येईल. तिन्ही पक्षांच्या मतांचे एकत्रीकरणच आम्हाला निवडणुकीत विजयी करू शकेल.

देवेंद्र फडणवीस यांनी जागावाटपाच्या चर्चेतील नेत्यांची नाराजी व बंडखोरीवरही भाष्य केले. जागावाटपाच्या मुद्यावर कुणीही तडजोड करण्यास तयार नाही. त्यामुळे यावेळी ज्या नेत्यांना निवडणूक लढवण्याची संधी देता आली नाही त्या आमच्या काही महत्त्वकांक्षी नेत्यांसाठी मला वाईट वाटते. फडणवीस यांनी यावेळी विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीचेच सरकार सत्तेत येणार असल्याचा दावाही केला. तसेच लोकसभा निवडणुकीतील निकालाचा विधानसभा निवडणुकीच्या निकालावर कोणताही परिणाम पडणार नाही असेही जोर देवून सांगितले.

उल्लेखनीय बाब म्हणजे विधानसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी महायुतीतील भाजपने आतापर्यंत १२१ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने ४५, तर राष्ट्रवादी काँग्रेसने ४९ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. महायुतीच्या घटकपक्षांत अजून ७३ जागांवर चर्चा सुरू आहे. या जागांवर चर्चा करण्यासाठी रविवारी सायंकाळी देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर महायुतीच्या नेत्यांची बैठक झाली. त्यात यापैकी काही जागांवर तोडगा निघाल्याची चर्चा आहे. पण त्याची पुष्टी होउ शकली नाही.

दरम्यान, महाराष्ट्रात येत्या २० तारखेला विधानसभा निवडणुकीचा फड रंगणार असून, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. तत्पूर्वी २०१९ च्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक १०५ जागा मिळाल्या होत्या. त्यावेळी शिवसेना - भाजपची युती होती. शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसला ५४ तर काँग्रेसला ४४ जागांवर समाधान मानावे लागले होते.

## निवडणूक आयोगाच्या पथकाने केले तब्बल ७ कोटी ५३ लाख रुपयांचे सोने जप्त



**मुंबई :** तासवडे टोल नाक्यावर निवडणूक आयोगाच्या पथकाने तपासणी दरम्यान सोन्या-चांदीच्या वस्तू जप्त केल्या आहेत. या बाबत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. यात तब्बल ७ कोटी ५३ लाख रुपयांचे सोने जप्त करण्यात आले आहे.

या बाबत प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार २७ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी १७:१५ वाजता कराड ते सातारा जाणाऱ्या रस्त्यावरील तासवडे टोल नाक्यावर MH १२ VF ३९३७ क्रमांकाची कुरिअर वाहतूक करणारी गाडी अडवण्यात आली. वाहनाच्या इनवाइसची तपासणी केल्यावर त्यात सोन्या-चांदीचे दागिने असल्याचे आढळले. या वस्तू इनवाइस प्रमाणे आहेत की नाही याची खात्री करण्यासाठी, सदर गाडी तळबीड पोलिस ठाण्यात सीसीटीव्ही निगराणीखाली सुरक्षित ठेवण्यात आली, ज्यामध्ये विविध तपासणी पथकांचे सहकार्य घेण्यात आले.

ही कारवाई एफएसटी पथक, जीएसटी अधिकारी, आयकर अधिकारी, कराड तहसीलदार आणि कराड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्या संयुक्त सहकार्याने करण्यात आली. तपासणीमध्ये ९ किलो ३९० ग्रॅम सोने आणि ६० किलो चांदी असल्याचे निष्पन्न झाले, ज्याची अंदाजे किंमत ७ कोटी ५३ लाख रुपये आहे.

सध्या आयकर विभागाकडून इनवाइसची पडताळणी सुरू आहे. तोपर्यंत सोन्या-चांदीचे दागिने पोलीस संरक्षणाखाली सुरक्षितपणे वाहनात ठेवलेले आहेत. कराड उत्तर FST पथकाने या वाहनाची तळबीड पोलीस ठाण्यातून कराड कोषागारात सुरक्षितपणे नेण्याची जबाबदारी घेतली आहे, आणि योग्य त्या सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तपासणी प्रक्रिया पूर्ण होताच पुढील माहिती दिली जाणार असल्याचे कळवण्यात आले आहे.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**


## संजय राऊत यांच्या 'टायपिंग मिस्टेक'च्या विधानावर नाना पटोले यांचा प्रेमाचा सल्ला



**मुंबई :** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाच्या मुद्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत काँग्रेसला निर्वाणीचा इशारा दिल्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राऊतांना हा विषय संपवण्याचा सल्ला दिला आहे. काँग्रेसला कोकणात जागा मिळाला नाही. मग आम्ही काय करायचे? संजय राऊत यांनी हा विषय आता संपवला पाहिजे. आपल्याला आपसात नव्हे तर महायुतीविरोधात लढायचे आहे. त्यामुळे संजय राऊत यांनी आपली भूमिका ही त्यांच्याविरोधात मांडली पाहिजे, असे ते म्हणालेत. संजय राऊत यांनी सोमवारी पत्रकारांशी संवाद साधताना काँग्रेसने सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात दिलेल्या उमेदवारीवर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. या ठिकाणी ठाकरे गटाने यापूर्वीच उमेदवार जाहीर केला असताना काँग्रेसने येथे उमेदवार देण्याची काहीच गरज नव्हती असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्यांना आपसात नव्हे तर महायुतीविरोधात लढण्याचा सल्ला दिला.

नाना पटोले म्हणाले, संजय राऊत यांची नाराजी असणे हे त्यांचे वैयक्तिक मत आहे. आम्हालाही कोकणात एकही जागा मिळाली नाही. मग आम्ही काय करायचे? कुणाला किती जागा मिळाल्या हा विषय नाही. संजय राऊत यांनी हा विषय क्लोज केला पाहिजे. आपल्याला महायुतीविरोधात लढायचे आहे. त्यामुळे त्यांनी आपली तोफ विरोधकांवर डागली पाहिजे हा माझा त्यांना प्रेमाचा सल्ला आहे.

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाच्या मुद्यावर आमच्या हायकमांडने निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यावर त्याच पातळीवर चर्चा होईल. मी त्यावर भाष्य करणार नाही. जागावाटप शेवटच्या दिवसापर्यंत चालते. अजूनही आमच्यात एक-दोन जागांवर चर्चा सुरू आहे. त्यात हायकमांडने लक्ष घातले आहे. मित्र पक्षांशीही चर्चा सुरू आहे. त्यामुळे हा प्रश्न लवकरच निकाली निघेल. पण कोण किती जागांवर लढणार? कोणता फॉर्म्युला आहे? याचे आकडे कुठून येतात हे आम्हाला माहिती नाही. आकडे ठरलेले नसतानाही ते माध्यमांमध्ये दाखवले जात आहेत, असे नाना पटोले म्हणाले.

नाना पटोले यांनी यावेळी सत्ताधारी भाजपमध्ये जागावाटपाच्या मुद्यावरून कपडे फाडले जात असल्याचाही आरोप केला. कोल्हापूरसारखे थोडे दिवस थांबा. भाजपमध्ये एकमेकांचे कपडे फाडले जात आहेत. तिकीट मिळणारा आनंदी होतो, तसा तिकीट न मिळणारा नाराज होतो. हा निवडणूक प्रक्रियेचा भाग असतो. पण महाविकास आघाडीमध्ये काहीही होत नाही. पत्रकारांनी महायुतीच्या कपडे फाडाफाडीकडे पाहिले पाहिजे, असे ते म्हणाले.

### प्रादेशिक पक्षांना सांभाळणे हे राष्ट्रीय पक्षांचे काम

नाना पटोले यांनी यावेळी महाराष्ट्र महायुतीच्या हातात गेला तर राज्यावर दुसऱ्यांचे कंट्रोल राहील, आपल्या महाराष्ट्रावर आपले नियंत्रण राहणार नाही असेही नमूद केले. प्रादेशिक पक्षांना सांभाळणे हे राष्ट्रीय पक्षांचे काम आहे. सर्व आघाड्या सांभाळणे हे ही राष्ट्रीय पक्षांचे काम आहे. आघाडी ही निवडणुकीत अत्यंत महत्त्वाची असते, असे ते म्हणाले.

दरम्यान, नाना पटोले यांनी यावेळी भाजपच्या नेत्यांना काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्याविषयी केलेल्या आक्षेपार्ह विधानाची समाचार घेतला. महिलांचा अपमान करणे हा भाजपचा स्वभावगुण आहे. त्यामुळे भाजपकडून दुसरी कोणतीही अपेक्षा करता येत नाही, असे ते म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ ऑक्टोबर २०२४


## बाहेरचा माणूस येऊन लढायला बोरिवली धर्मशाळा नाही - गोपाळ शेट्टी



**मुंबई :** भाजपने विधानसभा निवडणुकीसाठी २५ उमेदवारांची तिसरी यादी आज जाहीर केली. या यादीमध्ये बोरवली मतदारसंघाचे विद्यमान आमदार सुनील राणे यांचा पत्ता कट केला. पक्षाने त्यांच्याऐवजी संजय उपाध्याय यांना उमेदवादी जाहीर केली आहे. यामुळे निवडणुकीसाठी इच्छुक असलेले भाजपचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कोणीही बाहेरचा माणूस येऊन निवडणूक लढवायला बोरवली ही धर्मशाळा नाही, अशा शब्दांत गोपाळ शेट्टी यांनी भाजपला सुनावले आहे.

बोरिवली विधानसभा मतदारसंघातून माजी खासदार गोपाळ शेट्टी यांना उमेदवारी मिळेल, अशी चर्चा होती. पहिल्या आणि दुसऱ्या यादीत नाव न पुढील यादीत आपले नाव येईल, अशी त्यांना आशा होती. मात्र, भाजपने आज जाहीर केलेल्या तिसऱ्या यादीतही गोपाळ शेट्टी यांना संधी देण्यात आली नाही. त्यांच्याऐवजी संजय उपाध्याय यांनी तिकीट देण्यात आले. त्यामुळे गोपाळ शेट्टी यांच्यासह कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

भारतीय संविधानात एक नगरसेवक, एक विधानसभा आणि एक लोकसभेचा मतदारसंघ असतो. कायद्यात कुणीही कुठून लढू शकत नाही असे लिहिलेले नाही. परंतु, स्थानिक लोकांसाठी निवडणूक लढवली जाते. आधी विनोद तावडे यांना आणले. त्यानंतर सुनील राणे दिले. लोकसभा निवडणुकीतही मला बदलून पीयूष गोयल यांना आणले. तरीही मी त्यांची साथ दिली. मात्र, यंदाच्या विधानसभेलाही तसेच झाले. संजय उपाध्याय यांनी पक्षासाठी चांगले काम केले, यात शंका नाही. पण, बोरिवलीत अशाप्रकारे खेळ करणे योग्य नाही. कोणीही बाहेरचा माणूस येऊन निवडणूक लढवायला बोरवली ही धर्मशाळा नाही, असे गोपाळ शेट्टी म्हणाले.

गोपाळ शेट्टी म्हणाले, बोरिवलीने मला पुढे आणले आहे. तेथील लोकांसाठी जे काही करणे मला शक्य आहे, त्यासाठी मी कटिबद्ध आहे. कार्यकर्ते आणि बोरिवलीची जनता काय म्हणते, त्यानुसार मी निर्णय घेणार आहे. पक्षाने आज दिलेल्या निर्णयावर बोरिवलीकर नाराज आहेत. पक्षाचा निर्णय चुकीचा असून त्याविरोधात कार्यकर्ते जी भूमिका घेतील, त्यानुसार मी पुढचे पाऊल उचलणार, असा इशाराही गोपाळ शेट्टी यांनी भाजपला दिला आहे. ,

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या वेळेसही उत्तर मुंबईमधून गोपाळ शेट्टी यांच्याऐवजी पीयुष गोयल यांना उमेदवारी दिली होती. त्यावेळीही गोपाळ शेट्टी नाराज झाले होते. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची नाराजी दूर केली होती. त्यानंतर त्यांनी पीयुष गोयल यांचा प्रचारही केला होता. मात्र, यंदाच्या विधानसभेला गोपाळ शेट्टी आता काय निर्णय घेतात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## किशन तनवाणी यांनी माघार घेण्यासाठी सांगितलेले कारण चुकीचे - अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर :** किशनचंद तनवाणी हे शिंदे गटामध्ये प्रवेश करणार असल्याचे माझ्यावर कानावर आले आहे. याच कारणामुळे त्यांनी विधानसभा निवडणुकीतून त्यांनी माघार घेतली असावी. त्यांनी सांगितलेले कारण चुकीचे आहे, असे मला वाटत आहे. किशनचंद तनवाणी हे पक्षातच असून आम्ही फक्त त्यांना पदावरुन मुक्त केले आहे, असे विरोधीपक्ष नेते ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे यांनी सांगितले.

निवडणुकीसाठी तिकीट मिळाल्यानंतरही ऐनवेळी माघार घेणे हा शिवसेनेला गद्दारीपेक्षाही मोठा धोका देण्याचा प्रकार आहे, असेही दानवे म्हणाले.

छत्रपती संभाजीनगर मध्य मतदारसंघातून शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांच्या पक्षाकडून प्रदीप जैस्वाल यांना तिकीट मिळाले आहे. तर उद्धवसेनेने या ठिकाणी किशनचंद तनवाणी यांना उमेदवारी दिली होती. मात्र, आता तनवाणी यांनी माघार जाहीर केली आहे. शहरावर २०१४ सारखी (जलील विजयी झाले होते) परिस्थिती पुन्हा येऊ नये म्हणून हिंदुत्वासाठी मी हा निर्णय घेतला असल्याचे तनवाणी यांनी सांगितले होते.

## कन्नडमध्ये जाधव पती-पत्नी यांच्यात लढत रंगणार

**कन्नड (अक्षय चव्हाण) :** भाजपचे माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या कन्या संजना जाधव, यांनी रविवारी मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. कन्नड विधानसभेची जागा शिंदे गटाला सुटली आहे. या जागेवरून निवडणूक लढण्यासाठी त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला असला, तरी त्यांना उमेदवारी जाहीर झालेली नाही.

त्यांना उमेदवारी मिळाल्यास कन्नडमध्ये ठाकरे गटाचे आमदार उदयसिंग राजपूत, अपक्ष हर्षवर्धन जाधव आणि संजना जाधव अशी तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

जाधव यांना उमेदवारी मिळाल्यास राज्यात प्रथमच पती विरुद्ध पत्नी अशी थेट लढत होईल. हर्षवर्धन जाधव यांचे वडील स्व. रायभान जाधव १९८० मध्ये इंडियन नॅशनल कॉंग्रेस यू. कडून, १९९० मध्ये अपक्ष, १९९५ मध्ये कॉंग्रेस आयकडून तर, त्यानंतर हर्षवर्धन जाधव यांनी २००९ मध्ये मनसे कडून व २०१४ मध्ये शिवसेनेकडून दोन वेळा प्रतिनिधित्व केले. संजना जाधव २०१४ मध्येजिल्हा परिषद सदस्या होत्या. संजना जाधव यांचे कला शाखेत पदवीपर्यंत शिक्षण झालेले आहे. २०१९ पासून हर्षवर्धन जाधव आणि संजना जाधव विभक्त आहेत.

माजी मंत्री रावसाहेब दानवे यांच्या राजकीय वजनामुळे त्यांच्या कन्येला उमेदवारी मिळाल्यास, शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांचा रोष उफाळून येण्याची शक्यता राजकी वर्तुळात व्यक्त होत आहे. सेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची नाराजी दूर करण्याचे आव्हान त्यांच्या समोर असेल.






## मी मुख्यमंत्री नाही पण उपमुख्यमंत्री होणार : हसन मुश्रीफ



**कागल :** अजित पवार गटाचे नेते तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी उपमुख्यमंत्री पदाबाबत मोठे विधान केले आहे. त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची इच्छा व्यक्त केली आहे. महाराष्ट्रात महायुतीची सत्ता आल्यास, मी मुख्यमंत्री नाही तर उपमुख्यमंत्री नक्की होऊ शकतो, असे हसन मुश्रीफ म्हणाले. त्यांच्या वक्तव्यामुळे अजित पवारांचा पक्ष दोन-दोन उपमुख्यमंत्रीपदे मिळावी यासाठी प्रयत्न करत असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे.

हसन मुश्रीफ यांनी आज विधानसभा निवडणुकीसाठी कागल मतदारसंघामधून उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आल्यास मी मुख्यमंत्री होणार नाही. पण उपमुख्यमंत्री नक्की होऊ शकतो. मी अल्पसंख्याक असल्याने मला चांगली मला संधी मिळू शकते, असेही त्यांनी सांगितले. काही राज्यात दोन-दोन उपमुख्यमंत्री आहेत. आपल्या राज्यात तीन उपमुख्यमंत्री हा होऊ नये, असे हसन मुश्रीफ म्हणाले.

मी तुमचा हमाल म्हणून काम करेन हसन मुश्रीफ म्हणाले की, जर मला एवढे सगळे मला मिळणार असेल, तर आजपर्यंत ग्रामपंचायत सदस्य देखील झाला नाही, त्याला मत देऊन आपले मत फुकट घालवू नका. मागील २५ वर्षांपासून तुम्ही मला निवडून देत आहात. तुमच्या आशीर्वादाने मी १९ वर्षे मंत्री झालो. आता पुढची पाच वर्षे मला संधी दिली, तर मी तुमचा हमाल म्हणून काम करेन. मला एक लाखाचे मताधिक्य आवश्यक आहे. हाडाची काडे करा, पै पाहुण्यांच्या भेटीगाठी घ्या, मात्र गाफील राहू नका. आपण गाफील राहिलो तर घरात जास्त उंदीर फिरतात, असा टोला हसन मुश्रीफ यांनी समरजित घाटगेंना लगावला.

महायुती आणि महाविकास आघाडीचे पक्ष विधानसभा निवडणुकीला सामोरे जात असले तरी दोघांकडूनही आपला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्यात आला नाही. "आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढत आहोत" असे महायुतीने म्हटले आहे. तर, "निवडणूक जिंकल्यानंतर आम्ही आमचा मुख्यमंत्रिपदासाठीचा नेता ठरवू, असे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सांगितले आहे. मविआमध्ये कॉंग्रेस व ठाकरे गट हे पक्ष मुख्यमंत्रिपदासाठी मोर्चेबांधणी करत आहेत. तर, महायुतीत अजित पवार गटाचे कार्यकर्ते अजित पवारांना मुख्यमंत्री करावे यासाठी प्रचार करत आहेत. तर भाजप व शिवसेनेने (शिंदे) सध्या मुख्यमंत्रिपदाबाबत मौन बाळगले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ ऑक्टोबर २०२४


## अनिल देशमुख यांची निवडणुकीतून माघार



**काटोल :** माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यांनी मुलगा सलील याला निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. सलील देशमुख यांनी आज त्यांचे उमेदवारी नामांकन दाखल केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने अनिल देशमुख यांनी पहिल्या यादीतच काटोलमधून उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, मी किंवा सलील दोघांपैकी कोण लढणार हे २८ तारखेला समजणार असल्याचे अनिल देशमुख म्हणाले होते. त्यानुसार आज सलील देशमुख यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.

सलील देशमुख यांचा उमेदवारी अर्ज भरतेवेळी अनिल देशमुख यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी निवडणूक न लढण्याचे कारण सांगत भाजपवरही जोरदार हल्लाबोल केला. मी निवडणूक लढत नसलो तरी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर मी मंत्री होणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

भाजप सरकार तीन वर्षांपासून माझ्या मागे लागले आहे, तरी त्यांच्या बापाला मी घाबरत नाही. मी काटोलमधून उमेदवारी फॉर्म भरला नाही, कारण अनिल देशमुख यांनी फॉर्म भरला, तर काही तरी तांत्रिक अडचणी काढायची आणि तो फॉर्म रद्द करायचा, असे नियोजन सत्ताधाऱ्यांनी केले होते. त्यासाठी दिल्लीतून मोठे वकील आणून ठेवले आहेत. जे रश्मी बर्वेसोबत झाले, तसेच माझ्यासोबत करण्याचा डाव होता, असा गंभीर आरोप अनिल देशमुख यांनी केला आहे.

अनिल देशमुख पुढे म्हणाले की, मी निवडणुकीला उभा राहिलो असतो, तर माझ्यावर पूर्ण नवीन केसेस लावल्या असत्या. त्यामुळे मी सलीलला उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सांगितले. सलीलने मला उभे राहण्याचा आग्रह केला होता. मात्र, मी त्याला समजावून सांगितले आणि तो तयार झाला. मी उभा नसलो, तरी भविष्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार आहे. त्यानंतर शरद पवार साहेब मला विधान परिषदेवर घेतील, असा विश्वास अनिल देशमुख यांनी व्यक्त केला, तसेच ते मला मंत्रिमंडळातही घेतील, असेही ते म्हणाले.

पक्ष श्रेष्ठींनी मला संधी दिली. कोविड काळात मी घरी न बसता मतदारसंघात काम केले. अनिल देशमुख मंत्री असताना मी मतदार संघातील काम सांभाळत होतो. अनिल बाबूंना तुरुंगात टाकल्यानंतर मतदार संघातील कामांसाठी नागपूर ते मुंबई पाठपुरावा करत होतो. पुढील काळात तुमचा प्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांचे, गरीबांचे, तरुणांचे, महिलांचे मुद्दे विधिमंडळात उचलणार असा विश्वास देतो, असे सलील देशमुख यांनी म्हटले.

## उमरग्यात ९२६ अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणूक विभागाकडून दिले प्रशिक्षण



**उमरगा :** विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना शासकीय स्तरावर निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी येथील निवडणूक विभागाचे अधिकारी, कर्मचारी निवडणुकीच्या कामात व्यस्त आहेत. शनिवारी अंतुबळी सांस्कृतिक सभागृहात कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रियेचे पहिले प्रशिक्षण देण्यात आले. परंतु या प्रशिक्षणाला तब्बल ४३ कर्मचाऱ्यांनी दांडी मारली.

उमरगा विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया यशस्वी होण्याकरिता उमरगा व लोहारा तालुक्यातील प्राध्यापक, जिल्हा परिषद शिक्षक, कर्मचारी, पंचायत समिती, वनपरिक्षेत्र कार्यालय, सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे विभागासह कार्यालयांच्या ९२६ अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गणेश पवार यांनी प्रशिक्षण दिले. सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार गोविंद येरमे, तहसीलदार काशीनाथ पाटील आणि नायब तहसीलदार व महसूल कर्मचारी उपस्थित होते. प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नोंदणीसाठी ११ टेबलची मांडणी करण्यात आली होती. महसूल विभागाच्या २२ कर्मचाऱ्यांच्या यासाठी नेमणूका केल्या होत्या. विधानसभा निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यामुळे प्रशिक्षणार्थींना मतदान यंत्रांचे प्रात्यक्षिक आणि माहिती देण्यास आदर्श महाविद्यालयात प्रशिक्षण वर्गाची उभारणी करण्यात आली होती. शिवाय तज्ञ प्रशिक्षकांमार्फत मतदान यंत्रांची हाताळणी, सील करणे, मॉकपोल घेण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. हे प्रशिक्षण सकाळी ९ ते १ व दुपारी २ ते ६ असे दोन सत्रात घेण्यात आले. या प्रशिक्षणास ९२६ प्रशिक्षणार्थींपैकी पहिल्या सत्रात २७ तर दुसऱ्या सत्रात ४३ कर्मचारी गैरहजर होते. गैरहजर कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम कलम १३४ अंतर्गत कारवाई करण्यात येणार, असे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रशिक्षणाच्या यशस्वितेसाठी महसूलच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघात एकूण ३२१ मतदान केंद्र राहणार आहेत. मतदान केंद्राध्यक्ष व अधिकाऱ्यांची जबाबदारी, संविधानिक व असंविधानिक पॉकेट आदींचे प्रशिक्षण पर्यवेक्षक शैलेश महामुनी यांनी दिले. प्रा. शेखर दाडगे, नित्यानंद तेलंग आदींसह तज्ञ प्रशिक्षकांनी मतदान यंत्राची हाताळणी, सीलबंद करणे, मॉकपोल आदींचे प्रात्यक्षिक दाखवून प्रशिक्षण दिले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



Om Shanti Bahuuddeshiya Shikshan Sanstha's

GURU MISHRI AYURVED COLLEGE

Matoshri Badambai Motilalji Desarda Ayurved Hospital

BAMS 60 Seats College Code 3393

Preference Filling Started for CAP Round 2!

Shape Your Future in Medical Education

Guru Mishri Homoeopathic (4346) College Code
BHMS 100 Seats MD(Hom) 51 Seats PHD 18 Seats

Guru Mishri Pharmacy College (2642) DTE Code
D-Pharmacy 60 Seats

- Dr. Desarda's Families 43 years Experience in Medical education
- Hostel: Boy's & Girls with in campus Mess facilities & 24 Hrs round clock security
- Well established Hospital for Hands-on Training
- Easily Accessible Campus
- Result: One of the best in Maharashtra.



Approved by NCISM Delhi, Government of Maharashtra and Affiliated to MUHS,Nashik

CALL US NOW!
+91 98237 28282
+91 98340 45126

www.gurumishriamc.in www.gurumishrihmc.edu.in

Shelgaon, Tq. Badnapur, Dist. Jalna 431 202 (M.S)